दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २०६ । शनिवार ९ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# ट्रॅव्हल जिहाद विरोधात नगरमध्ये सोमवारी मोर्चा

### दिगंबर गेंट्याल यांची माहिती । प्रवासी महिला व तरुणींच्या छेडछाडीकडे वेधणार लक्ष



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील बसस्थानक परिसरात ट्रॅव्हल एजंटकडून हिंदू मुलींची छेडछाड व फसवणूक होत असल्याच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सोमवार दिनांक ११ मे रोजी नगर शहरात मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती हिंदुत्ववादी कार्यकर्ते दिगंबर गेंट्याल यांनी दिली.

शहरातील मुख्य करून माळीवाडा व स्वस्तिक बसस्थानक परिसरात अवैधरीत्या चालवल्या जाणाऱ्या ट्रॅव्हल एजन्सींचा सुळसुळाट झाला असून या ठिकाणी काही जिहादी प्रवृत्तीचे लोक प्रवासी हिंदू महिला व मुलींची छेडछाड करतात. असे अनेक प्रकार शहरात घडले आहेत. मुलींना जाळ्यात ओढण्यासाठीही जिहादी यंत्रणा काम करीत असल्याचे दिसून आले आहे.

या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच हिंदू समाजामध्ये जागृती होण्यासाठी सोमवार दिनांक ११ मे रोजी सकाळी हा मोर्चा निघणार आहे. माळीवाडा बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात होणार असून या मोर्चात मोठ्या संख्याने हिंदू समाजाने सहभागी व्हावे, असे आवाहन गेंट्याल यांनी केले आहे.

## विकासकामांतून अहिल्यानगरची प्रकाशाकडे वाटचाल - पालकमंत्री विखे

### एलईडी व तिरंगा लाईटने उजळला तारकपूर रस्ता; शहराच्या सौंदर्यात भर
### डीएसपी चौक ते पत्रकार चौक दरम्यान पथदिव्यांचे लोकार्पण संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील महत्त्वाचा वाहतूक मार्ग असलेला तारकपूर रस्ता आता एलईडी पथदिवे आणि तिरंगा लाईटने उजळून निघाला आहे. डीएसपी चौक ते पत्रकार चौक दरम्यान बसविण्यात आलेल्या आधुनिक एलईडी पथदिव्यांच्या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

तारकपूर रस्ता हा मनमाड महामार्गाला जोडणारा तसेच शहरातील विविध भागांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने या मार्गाच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिला. त्या निधीतून रस्ता काँक्रिटीकरण, दुभाजक, पावसाच्या पाण्यासाठी गटर, तसेच फुटपाथची कामे पूर्ण करण्यात आली. त्यानंतर आता एलईडी पथदिवे व तिरंगा लाईट बसवून या रस्त्याचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

या लोकार्पण सोहळ्याला आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिति



सभापती पैलवान सुभाष लोंढे, महिला बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक मोहित पंजाबी, जितू गंभीर, जय भोसले, नगरसेविका शारदाताई ढवण, सुजाता पडोळे तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर शहर विकासकामांच्या माध्यमातून वेगाने बदलत असून प्रकाशाकडे वाटचाल करत आहे. तारकपूर रस्त्याचे काँक्रिटीकरण आणि एलईडी पथदिव्यांमुळे शहराच्या वैभवात भर पडली आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, तारकपूर रस्ता हा सावेडी उपनगराला जोडणारा तसेच छत्रपती संभाजीनगर व मनमाड महामार्गाला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून मोठ्या ■ पान ४ वर

## तक्रार निवारण दिनात एक हजार अर्जांचा निपटारा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दिनांक आठ मे रोजी आयोजित तक्रार निवारण दिन उपक्रमात जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांत मिळून एकूण एक हजार तक्रारींचा निपटारा करण्यात आला, अशी माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षण किरणकुमार कबाडी यांनी दिली.

नागरिकांच्या प्राप्त तक्रारी अर्जाचे निवारण करण्याच्उया द्देशाने पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये दिनांक ८ मे रोजी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांत प्राप्त झालेल्या तक्रारी अर्ज निकाली काढण्याकरिता 'तक्रार निवरण दिन' आयोजित करण्यात आला होता.

जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर राबविलेल्या या उपक्रमास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला, नागरीकांचे तक्रारी अर्ज तात्काळ निकाली काढण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहिम राबविली असून अनेक प्रकारणामध्ये सकारात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना थेट पोलीस अधिकारी यांच्यासमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली, तक्रारादाने समाधान व्यक्ती केले असुन प्रलंबिध प्रकरणात लवकरात लवकर कार्यवाही होईल अशी अपेक्षा व्यक्ती केली आहे.

प्राप्त झालेल्या वरिष्ठ व स्थानिक अर्जातील अर्जदार व गैरअर्जदार यांना संबंधित पोलीस ठाण्यात येथे तक्रारी अर्जाच्अया नुषंगाने चौकशी कामी हजर राहण्याचे आवाहन केल्याने एकूण १०३६ अर्जदार हे हजर झाले. सदर अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांच्या तक्रारी अर्जावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही ■ पान ४ वर



## बुऱ्हाणनगर येथील तुळजाभवानी देवीची चंदन लेप लावून विशेष पुजा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बुऱ्हाणनगर, ता.जि.अहिल्यानगर येथील श्री अंबिका देवी मंदिरात ०९ मे रोजी देवीस थंडावा देण्यासाठी चंदन लेप लावून विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी देवीची आकर्षक फुलांनी व पारंपरिक अलंकारांनी सजावट करण्यात आली होती. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर देवीस शीतलता प्रदान करण्यासाठी चंदन लेप सेवा करण्यात आली. या वेळी मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी झाली होती. उपस्थित भाविकांनी भक्तिभावाने देवीचे दर्शन घेतले व पूजेत सहभाग नोंदविला. आरती व प्रसाद वितरण करण्यात आले. वंशपरंपरागत प्रमुख तथा पुजारी ॲड. विजय अर्जुन भगत, ॲड. अभिषेक विजय भगत. श्री अंबिका तुळजाभवानी देवी मंदिर देव्हारा, बुऱ्हाणनगर, ता.जि.अहिल्यानगर.

## साखरपुडा कार्यक्रमातून दागिने लांबविणाऱ्या बालकाला मध्य पदेशातून घेतले ताब्यात

### सोळा तोळे दागिन्यांसह मुद्देमाल हस्तगत कोतवाली पोलिसांनी लावला गुन्ह्याचा छडा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील साखरपुडा कार्यक्रमातून सोळा तोळ्याचे दागिने लांबविणा-या विधीसंघर्षित बालकास कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून १६ तोळे वजनाचे दागिने व २५ हजार रोख असा एकूण १७ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याबाबत सिंधू महेश माने (वय ५२ धंदा शिक्षक, रा. शेवगाव रोड, तिसगाव, ता. पाथर्डी) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. दिनांक २ मे रोजी फिर्यादीचा भाचा आशितोष नंदकुमार मरकड याचा साखरपुडा श्रेया गार्डन केडगाव येथे होता. यावेळी फिर्यादीने तिच्याकडील दागिने कापडी पिशवीमध्ये ठेवले होते. तसेच मेव्हणे नंदकुमार मरकड यांनी सहा तोळे वजनाचे सोन्याचे गंठण व अर्धा तोळा वजनाची पिळयाची अंगठी नवरी व नवरदेव यांना भेट म्हणून देण्याकरिता फिर्यादीकडे दिलेले होते.

साखरपुडा कार्यक्रम चालू असताना फिर्यादी नातेवाईकासंह फोटो काढण्यासाठी स्टेजवर गेल्या ■ पान ४ वर



**पथकात यांचा सहभाग**

सदरची कारवाई पाोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुवर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, सपोनि कुणाल सपकाळे, उपनिरीक्षक प्रवीण पाटील व गणेश देशमुख, पोहेकॉ दळवी, पोहेकॉ बोरगे, पोहेकॉ दौड, पोहेकॉ /साबीर शेख, पोहेकॉ राहुल शिंदे, एमआयडीसीचे पोहेकॉ संदीप पवार, पोहेकॉ रोहिणी दरंदले, मपोना वर्षा पंडीत, पोकॉ सूरज कदम, दीपक रोहोकले, सत्यजित शिंदे, रमेश शिंदे, अतुल कोतकर, सचिन लोळगे, अमोल गाडे , अतुल लाटे, अतुल काजळे, शिरीष तरटे, राहुल मासाळकर, गंगाधर आंग्रे, किरण बडे, पल्लवी रोहकले तसेच दक्षिण मोबाईल सेलचे पोकॉ राहुल गुंडू यांच्यासह बोडा (मध्यप्रदेश) पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी देवेंद्रसिंह राजपूत, पोकॉ कपिल अटारिया, पोकॉ दुष्यंत जाट, मपोकॉ पूजा मुवेल यांच्या पथकाने केली.

## कोळी बोडखा येथील तरुणाचा घनसावंगी जवळ दुचाकी अपघातात मृत्यू; आई गंभीर जखमी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** लग्न सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी गेलेल्या तरुणाच्या दुचाकीला भरधाव वाहनाने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याची आई गंभीर जखमी झाली आहे. ही दुर्दैवी घटना शुक्रवारी दि. ८ रोजी घनसावंगी परिसरात घडली.



मृत तरुणाचे नाव नविद रियाज (मामू) पटेल (वय १९, रा. कोळी बोडखा, ता. पैठण) असे असून, त्याची आई सोबत दुचाकीवरून जात असताना हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, नविद हा आपल्या आईसोबत दुचाकी क्रमांक (२० ७६३५) वरून नातवाइकांच्या लग्न सोहळ्यासाठी गेला होता. कार्यक्रम आटोपून परत येत असताना समोरून भरधाव येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीची त्यांच्या वाहनाला जोरदार धडक बसली.

या भीषण अपघातात नविदच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. तर त्याची आई गंभीर जखमी झाली असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नविद हा अविवाहित होता. घटनेची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. नविदच्या पश्चात आई-वडील, दोन लहान भाऊ असा परिवार आहे. घटनेनंतर नातेवाईकांनी ग्रामीण रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.

## प्रवाशांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार - पालकमंत्री विखे पाटील

### सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीचे भूमिपूजन उत्साहात । पाच कोटींच्या निधीतून बसस्थानक उभारणी; सावेडी उपनगराला दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीच्या कामाला अखेर मुहूर्त लागला असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न झाला. आमदार संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या कामाला चालना मिळाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ''सावेडी बस स्थानकाच्या माध्यमातून प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. अनेक ठिकाणी बस स्थानकांची अवस्था वाईट असून अस्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असतो. मात्र आता एसटी महामंडळ प्रवाशांसाठी दर्जेदार



सुविधा देण्यावर भर देत आहे. शिवशाही, शिवाई, इलेक्ट्रिक बस, लाल परी आणि हिरकणी बस अशा विविध सेवांमुळे प्रवाशांना अधिक चांगला अनुभव मिळत आहे.

ते पुढे म्हणाले की, प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन महिलांना ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास अशी सुविधा देण्यात आली आहे. सुरक्षित व सुलभ प्रवासामुळे नागरिकांचा एसटीकडे ओढा वाढला असून महामंडळही फायद्यात येत आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून सावेडी बस स्थानकासाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. सावेडी उपनगराचा विस्तार झपाट्याने होत असून या भागात नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी सावेडी नाका येथे बस स्थानक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या ठिकाणावरून नागरिकांना सहज प्रवास करता येईल. शासनाच्या सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

या भूमिपूजन सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे माजी उपमहापौर ■ पान ४ वर

'तुम्ही निवांत झोपा, आम्ही जागे आहोत!'

## नेवासा पोलीस निरीक्षकांचे मध्यरात्री 'मिशन ऑलआऊट'

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–**ज्यावेळी संपूर्ण नेवासा तालुका गाढ झोपेत असतो, नागरिक आपल्या घराचे दरवाजे लावून निवांत विसावलेले असतात, त्याच वेळी समाजाच्या सुरक्षिततेचा कणा असलेले पोलीस मात्र रस्त्यावर 'नाकाबंदी' करून डोळ्यात तेल घालून पहारा देत असतात. याचेच जिवंत दर्शन काल मध्यरात्री नेवासा फाटा व परिसरात पाहायला मिळाले.

**मध्यरात्री २ ची वेळ अन् खाकीचा पहारा**



गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी 'मिशन ऑलआऊट' राबवले जात आहे. याच मोहिमेअंतर्गत नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले आपल्या ताफ्यासह मध्यरात्री २ वाजता रस्त्यावर उतरले होते. स्वतः पोलीस निरीक्षक आपल्या कर्मचाऱ्यांसह नाकाबंदीच्या ठिकाणी हजर राहून प्रत्येक संशयास्पद हालचालीवर लक्ष ठेवून होते.

**जनतेच्या सुरक्षेसाठी रात्रंदिवस तत्पर** ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### मे महिन्याच्या तडाख्याने पैठणकर त्रस्त; उकाड्याने जनजीवन विस्कळीत

पैठण - मे महिन्यातील वाढत्या तापमानामुळे पैठण शहरासह तालुक्यात उकाड्याची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली असून नागरिक हैराण झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. अचानक वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांचे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना उष्णतेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. भर दुपारी घराबाहेर पडणे नागरिकांसाठी कठीण बनले आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे पंखे, कुलर आणि एसीच्या मागणीत वाढ झाली असून वीज वापरातही मोठी वाढ झाली आहे. काही भागांत लोडशेडिंगचा फटका बसत असल्याने नागरिकांच्या अडचणीत भर पडत आहे. दरम्यान, शहरात थंड पेये, उसाचा रस, लस्सी आणि आईस्क्रीम विक्रीत वाढ झाली आहे. डॉक्टरांनी नागरिकांना दुपारच्या वेळेत शक्यतो बाहेर न पडण्याचा सल्ला दिला असून भरपूर पाणी पिण्याचे आणि उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन केले आहे.

### लिटिल वंडर्स स्कूल व विज्डम हायस्कूल,जेऊर येथे नवीन प्राचार्यांची नियुक्ती



जेऊर - अहिल्यानगर येथील लिटिल वंडर्स स्कूल व विज्डम हायस्कूल येथे श्रीमती चंद्रमौळी श्रीमती श्री धात्री यांनी दिनांक १ मे २०२६ पासून प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला आहे. श्रीमती श्री धात्री यांना शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील समृद्ध अनुभव लाभलेला आहे. यापूर्वी त्यांनी नारायणा स्कूल, हैदराबाद येथे प्राचार्य म्हणून कार्य करताना शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांना विशेषतः इयत्ता ६ वी ते १० वी साठी व फाउंडेशन मार्गदर्शनाचा उत्कृष्ट अनुभव असून, स्पर्धात्मक परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यात त्यांचे विशेष प्रावीण्य आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावेल व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी चालना मिळेल, असा विश्वास संस्थेच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.संस्थेच्यावतीने त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात येत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा नव्या उंचीवर पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. - व्यवस्थापन (लिटिल वंडर्स स्कूल व विज्डम हायस्कूल, जेऊर, अहिल्यानगर. या वेळी शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांच्यावतीने आयोजित केलेल्या स्वागत समारंभात आपले मनोगत व्यक्त करताना श्रीमती श्री धात्री यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला, इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम बनविण्याची तयारी येथेच करून घेऊ व विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेला एक नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार व्यक्त केला.या कार्यक्रमासाठी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच जेऊर पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाची यशोगाथा कायम

**सलग २२ वर्षे १००% निकालाचा विक्रम अबाधित । स्वराली गवारे प्रथम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाने सलग २२ व्या वर्षी १०० टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत यंदाही उत्कृष्ट यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या दहावी परीक्षेचा निकाल अत्यंत उज्ज्वल लागला असून विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अधिक भक्कम केली आहे.यावर्षी विद्यालयातून एकूण ११५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून त्यामध्ये ७६ विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले आहे. तसेच ३२ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत तर ७ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत.विद्यालयातील कुमारी स्वराली गवारे हिने ९७.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी हिना शेख हिने ९६.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कुमारी जिया निनारीया हिने ९४.४६ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विशेष म्हणजे ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या एकूण १४ विद्यार्थिनी आहेत.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव बबन कोतकर, सहसचिव रावसाहेब सातपुते, अध्यक्ष रमेश गवळी, उपाध्यक्ष भास्कर जासूद, खजिनदार प्रल्हाद साठे, संचालक डॉ. सुभाष बागले, जयद्रथ खाकाळ, दगडू साळवे तसेच संस्थेच्या सर्व संचालक मंडळाने यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय निक्रड, जयश्री कोतकर, विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांच्या यशामागील परिश्रमांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या या घवघवीत यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**अहिल्यानगर जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचा**

# दक्षता, शांतता कमिटी अनिस नगर शाखेच्या वतीने स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक मा.मुम्मका यांची भेट घेऊन त्यांचे पोलीस दक्षता समिती, नगर शांतता कमिटी, व अनिस अहिल्यानगर समितीच्या वतीने स्वागत केले. त्यांच्या नियुक्तीमुळे नगर जिल्ह्याच्या पोलीस यंत्रणेला सक्षम व दूरदृष्टी पूर्ण नेतृत्व लाभल्याचा विश्वास यावेळी समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे राखण्यासाठी तसेच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दल अधिक कार्यक्षमपणे काम करेल असा विश्वास समितीचे वतीने व्यक्त केला. यावेळी शांतता समितीच्या नलिनी गायकवाड, एडवोकेट गीता कटारिया, नीता बर्वे, रजनी ताठे, एडवोकेट विद्या शिंदे, अनंतराव गारदे, रवी सातपुते, राजेंद्र कर्डिले, रिजवान शेख, राजू देठे, सचिन ठोंबरे, सोमनाथ जंगम देवा आदीसह दक्षता शांतता समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री ढोकेश्वर विद्यालयाचा दणदणीत निकाल; सृष्टी पवार ९७.४०% गुणांसह प्रथम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांनी एस.एस.सी. परीक्षा २०२६ मध्ये उज्ज्वल यश संपादन करत निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल तब्बल ९५.१० टक्के लागला असून सेमी इंग्लिश विभागाचा निकाल १०० टक्के लागल्याने विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षी परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण १४३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये ५२ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य, ४५ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ३३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी, तर ६ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणी मिळवली.

विद्यालयात कु. सृष्टी संतोष पवार हिने ९७.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच कु. तन्वी मंगेश वाळुंज (९६%), कु. श्लोका भानुदास अडसूळ (९५.८०%), कु. सेजल संदीप गायकवाड (९५.४०%) आणि कु. समीक्षा नितीन खेडकर (९४.४०%) यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक मिळवत विद्यालयाच्या यशात भर घातली.

९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वर्षा पायमोडे, चैतन्य झावरे, तेजश्री ठाणगे, समृद्धी रोकडे, ईश्वरी नऱ्हे, संस्कार भगत, मयूर वाळुंज आणि विराज तराळ यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. रा. ह. दरे साहेब, उपाध्यक्ष डॉ. विवेकजी भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेशदादा मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे मॅडम, जेष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे, सितारामजी खिलारी तसेच गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब सिताराम खिलारी यांनी अभिनंदन केले.

विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी सर, पर्यवेक्षक मनीषा गाडगे मॅडम, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, शालेय व्यवस्थापन समिती तसेच पालकांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक म्हणून श्री. रविंद्र मते (मराठी), श्री. बाबासाहेब जाधव (इंग्रजी), श्रीम. वर्षा भोंडवे (हिंदी), श्रीम. वैशाली गायखे (गणित), श्रीम. सोनल रोहोकले (विज्ञान) आणि श्री. संदीप महांडुळे (सामाजिक शास्त्र) यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# कौशल्या विद्यामंदिर पाटेगावचा दहावी निकाल ९७.९३ टक्के

**विद्यार्थ्यांचे घवघवीत यश**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर, पाटेगाव ता. पैठण येथील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ चा निकाल ९७.९३ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

यंदाही शाळेने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्यासह यश मिळविले.

शाळेतून कु. श्रुतिका ज्ञानेश्वर पवार हिने ९६.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. वैष्णवी कृष्णा कर्पे हिने ९५.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर हर्षद संदीप जाधव याने ९४.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच कु. सृष्टी दत्तात्रय येळवंते (९४%), कु. दर्शना शरद नलभे (९२.८०%), कु. चैताली नामदेव औटे (९२.४०%), आदित्य मारुती मिटकर (९२%), शेख मुजम्मिल युनूस (९२%), कु. अक्षरा गणेश कवादे (९१.६०%), कु. स्वामीनी भिमराव दौंड (९१.२०%), कु. निकिता संदीप मडके (९१%), अविनाश हरिभाऊ कणसे (९०.६०%), आदित्य अमोल तांबे (९०.४०%), कु. मयुरी जालिंदर ठेणगे (९०.४०%) आणि शिवम आबासाहेब पाचे (९०.२०%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

एकूण १४५ विद्यार्थ्यांपैकी ७० विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य, ५० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर १६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळविले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांतजी गायकवाड, सचिव वाल्मिकरावजी सुरासे, उपाध्यक्ष विठ्ठलराव पैठणकर, कोषाध्यक्ष विशालभैय्या सुरासे, प्राचार्य निलेशजी गायकवाड तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पुण्यातील नोबल हॉस्पिटलने महाराष्ट्रातील पहिल्या रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेची यशस्वी कामगिरी करत रचला इतिहास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हडपसर येथील नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरने रोबोटचा वापर करून कीहोल पोर्ट्सद्वारे संपूर्णपणे करण्यात येणारी रोबोटिक लेफ्ट एट्रियल मीक्झोमा एक्सिजन ही गुंतागुंतीची हृदयातील गाठ काढण्याची शस्त्रक्रिया नुकतीच यशस्वीरित्या केली.हृदयविकार उपचार क्षेत्रात हे एक महत्वाचे यश आहे.

ही शस्त्रक्रिया एका ५५ वर्षीय महिलेवर करण्यात आली. नियमित तपासण्यांमध्ये त्यांच्या छातीच्या डाव्या कप्प्यात ट्युमर (गाठ)असल्याचे निदान झाले होते. अशा प्रकारच्या गाठींना लेफ्ट एट्रियल मीक्झोमा असे म्हणतात. ही सामान्यपणे आढळणारी आणि कर्करोगग्रस्त नसलेली गाठ (बेनाइन ट्युमर) असली तरी यामुळे रुग्णांना स्ट्रोक येणे किंवा धाप लागणे यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.अशा स्थितीत शस्त्रक्रियेद्वारे गाठ काढून टाकणे हा एकमेव उपचार पर्याय असतो.

पारंपरिकपणे, या शस्त्रक्रियेसाठी मीडियन स्टर्नोटॉमी ची आवश्यकता असते, ज्यामध्ये छाती उघडण्यासाठी आणि हृदयापर्यंत पोहोचण्यासाठी छातीचे हाड कापावे लागते.नोबल हॉस्पिटलमध्ये प्रथमच, हीच प्रक्रिया रोबोटच्या साहाय्याने, केवळ लहान पोर्ट इन्सिजनद्वारे करण्यात आली. या प्रक्रियेत कोणताही मोठा छेद नाही, किंवा छातीचे हाड कापण्याची गरज भासली नाही. या प्रक्रियेत हार्ट लंग मशीनचा वापर करत हृदय थांबवण्यात आले. थ्रीडी कॅमेराच्या साह्याने हृदयाच्या डाव्या कप्प्यात जाऊन अचूकपणे ही गाठ काढण्यात आली.

रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेचे रुग्णांना थेट अनेक फायदे मिळतात. त्यामध्ये कमीत कमी रक्तस्त्राव,शस्त्रक्रियेनंतर कमी वेदना, जलद पुनर्प्राप्ती आणि रुग्णालयात कमी कालावधी, छातीवर मोठ्या व्रणाऐवजी लहान व्रण अशा अनेक फायद्यांचा समावेश आहे. करण्यात आलेले छेद हे रोबोटच्या साह्याने टाके घालून बंद करण्यात आले.

हे हृदय शस्त्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पाऊल असून हृदय शल्यचिकित्सक डॉ. धैर्यशील कणसे यांच्या नेतृत्वाखाली, वरिष्ठ कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. आशिष पोखरकर यांच्या सहकार्याने पार पडली. शस्त्रक्रिया करणाऱ्या टीममध्ये डॉ. अनिरुद्ध ढेकणे आणि डॉ. एन. जाधव यांचा समावेश होता. भूल देण्याचे काम डॉ. सम्राट मदनाईक आणि डॉ. परमिता दीक्षित यांनी केले.

ही प्रक्रिया भारतीय हृदयरोग शल्यचिकित्सकाने विकसित केलेल्या एसएसआय मंत्रा या रोबोटिक प्रणालीचा वापर करून करण्यात आली. हे प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानातील भारताची वाढती क्षमता दर्शवते.

या यशामुळे अनेक हृदय रुग्णांसाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. तज्ञांच्या मते, रोबोटिक तंत्रज्ञान लवकरच ट्यूमर काढण्यापलीकडे जाऊन रोबोटिक एएसडी क्लोजर, रोबोटिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि रोबोटिक-असिस्टेड बायपास शस्त्रक्रियांपर्यंत विस्तारणार आहे. शस्त्रक्रियेतील कौशल्य जसजसे वाढेल, तसतशी ही पद्धत संपूर्ण भारतात आणि जागतिक स्तरावर वापरली जाऊ शकते, ज्यामुळे प्रगत हृदयसेवा कमी त्रासदायक आणि अधिक सुलभ होईल.

या यशाबद्दल बोलताना डॉ. कणसे म्हणाले की, हृदय शस्त्रक्रियेतील एका नव्या युगाची ही केवळ सुरुवात आहे, जिथे रुग्णांना कमीत कमी त्रासासह जागतिक दर्जाचे परिणाम मिळतील. नोबल हॉस्पिटल्स ॲन्ड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे म्हणाले की, हा महत्वाचा टप्पा आपल्या शहरातील हृदयविकार उपचार क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवतो. रोबोटिकच्या साहाय्याने केलेली शस्त्रक्रिया अधिक अचूकता देतेच, पण त्याचबरोबर रुग्णांना जलद बरे होणे, कमी वेदना आणि उत्तम वैद्यकीय परिणाम शक्य करते. आरोग्यसेवेचे नवे मापदंड स्थापित करण्यासाठी आम्ही अत्याधुनिक वैद्यकीय नवकल्पना आणि कुशल मनुष्यबळामध्ये सातत्याने गुंतवणूक करत राहू.

डॉक्टरांच्या टीमचे अभिनंदन करताना, नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने म्हणाले की, अशा प्रकारच्या प्रगतीमुळे या हृदयविकारावरील उपचारांची गुणवत्ता लक्षणीयरीत्या उंचावेल आणि प्रगत रोबोटिक हृदयशस्त्रक्रियेच्या क्षेत्रातील क्षमता अधिक बळकट होईल. रुग्णांना सर्वोत्तम परिणाम मिळवून देण्यासाठी, रुग्ण-केंद्रित आणि तंत्रज्ञान-आधारित आरोग्यसेवेसाठी नवीन परिसीमा ओलांडत आम्ही आणखी प्रगत उपचारांच्या दिशेने वाटचाल करत राहू.

डॉ. दिविज माने म्हणाले की, आज पुणे अत्याधुनिक हृदयरोग उपचारांसाठी जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण करत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तज्ज्ञ शल्यचिकित्सकांद्वारे,या क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केली जाणारी अत्याधुनिक रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया येथेच यशस्वीरीत्या केली जाऊ शकते आणि त्याचे परिणाम जगातील सर्वोत्तम केंद्रांच्या बरोबरीचे आहेत, हे आज आमच्या टीमने दर्शविले आहे. अद्ययावत उपचारांसाठी रुग्णांनी देशाबाहेर जाण्याची गरज नाही; ते अद्ययावत व सर्वोत्कृष्ट उपचार त्यांच्या पर्यंत पोहोचवण्याची आमची वचनबद्धता आहे. हा टप्पा आमच्या ठाम निर्धाराचे प्रतीक आहे. वैद्यकीयदृष्ट्या काय साध्य करणे शक्य आहे, यासाठी सीमा आम्ही सातत्याने विस्तारत राहू. तंत्रज्ञान आणि कौशल्यात अविरत गुंतवणूक करू आणि रुग्ण-केंद्रित, परिणाम-आधारित हृदयरोग उपचारांसाठी नवे मापदंड स्थापित करू.प्रगत हृदय शस्त्रक्रियेसाठी एक प्रमुख केंद्र म्हणून जगाचे लक्ष आता अधिकाधिक पुण्याकडे वळेल, आणि त्या चळवळीचे नेतृत्व करण्याचा आमचा निर्धार आहे. नोबल हॉस्पिटल्स ॲन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने म्हणाले की, आमच्या हॉस्पिटलमध्ये रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेची सुरुवात ही तंत्रज्ञान आणि वैद्यकीय उत्कृष्टतेप्रति आमची वचनबद्धता दर्शवते. ही महत्त्वपूर्ण कामगिरी योग्य नियोजन, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांमुळे आणि आमच्या कुशल बहुशाखीय टीमच्या समर्पणामुळे साध्य झाली आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### शिक्षणशास्त्र विषयात राहुल गायकवाड यांना पीएच.डी. प्रदान



अहिल्यानगर- येथील राहुल रतन गायकवाड यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन कार्यासाठी डॉ. गायत्री गोरक्षनाथ चौकडे आणि प्रा. संजीव सोनावणे यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यादरम्यान मार्गदर्शक आणि संशोधक यांना नॉर्वे आणि फिनलंड या देशांमध्ये अभ्यास व शैक्षणिक निरीक्षण करण्याची संधी मिळाली. आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अनुभवामुळे त्यांच्या संशोधनाला अधिक व्यापक दृष्टी प्राप्त झाली.बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत आणि नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### म्हस्के विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षेचा ९१.२२% निकाल



अहिल्यानगर- जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव-ने संचलित काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर आहिल्यानगर या विद्यालयाने फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल ९१०२२ टक्के लागला आहे. या परीक्षेसाठी एकूण ११४विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विशेष योग्यता श्रेणी १५,प्रथम श्रेणीत २२, द्वितीय श्रेणीत ४७,तर तृतीय श्रेणीत १० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. प्रथम क्रमांक चैतन्य थोरात ९३.६०%, द्वितीय क्रमांक अपूर्वा नारखेडे ९२.४०%, तृतीय क्रमांक आदित्य काळे व अंजली बडे ८८.४०% गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पा. साहेब, मा. आ. चंद्रशेखर घुले पा. साहेब, जि.प. अध्यक्षा ना. सौ. राजश्रीताई घुले पा., पं. स. सभापती डॉ. क्षितिज (भैय्या) घुले पा. साहेब, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. के. वाय. नजन सर, संस्था समन्वयक श्री. विजय काशिद सर, प्राचार्या सौ. शितल बांगर तसेच प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे यांनी अभिनंदन केले. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीमुळे आणि शिक्षकांच्या परिश्रमांमुळेच हा यशाचा आलेख उंचावत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

### जय मल्हार विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

अहिल्यानगर- पिंपळगाव रोठा तालुका पारनेर येथील जय मल्हार विद्यालयाचाच्या १० वी बोर्ड मार्च २०२६ परीक्षेचा निकाल ९५.८३%टक्के लागला असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.मार्च २०२६ च्या बॅचमध्ये विद्यालयातील २५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.विद्यालयाचा शेकडा निकाल ९५.८३% टक्के लागला आहे. प्रथम येणारे पाच विद्यार्थी पुढील प्रमाणे प्रथम वनिजा शिवाजी उमाप ८७.६० %,द्वितीय प्रिया बाळु माकरे ८१.६०%,तृतीय प्रांजल भाऊसाहेब जगदाळे ८१.०० %,चतुर्थ आदित्य अशोक सुपेकर ७८.६०%,पाचवी कांचन सुरेश मुंढे ७८.४०% संस्थेचे सचिव ॲड.पांडुरंग गायकवाड, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री उत्तम सुंबरे यांनी शाळेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे.

# नेहरू मार्केट येथे व्यापारी संकुल व भाजी मार्केट विकास कामाचे भूमिपूजन

**अहिल्यानगर शहरात पब्लिक पार्क उभे करा – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । इतिहास जपत आधुनिक विकास; शहराच्या अर्थकारणाला मिळणार नवी चालना**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** चितळे रोड येथील नेहरू मार्केट परिसरात भव्य व्यापारी संकुल व भाजी मार्केट विकास कामाचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या विकासकामामुळे शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठेला आधुनिक स्वरूप मिळणार असून, पारंपरिक वारसा जपत नव्या युगातील सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर शहर विकास कामातून वेगाने बदलत आहे. नेहरू मार्केटचा अनेक दिवसांचा प्रश्न मार्गी लागत असून त्याला एक इतिहास आहे, तो टिकून ठेवण्याचे काम आपल्या सर्वांचे आहे. जुन्या शहरांमध्ये आजही जुन्या पाऊलखुणा दिसतात. माझे आजोबा पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील जिल्हा बँकेचे चेअरमन होते, त्या काळात आम्ही नेहरू मार्केट जवळ मुरमुऱ्या घेण्यासाठी येत असू. सुट्टीत येथे फिरायला यायचो.

ते पुढे म्हणाले की, आजच्या काळात फास्ट फूड, मॉल संस्कृती आणि ऑनलाइन व्यवहार वाढले आहेत. त्यापुढे आता एआय () आले आहे. यामुळे भविष्यात बेरोजगारीचे संकट वाढण्याची शक्यता आहे आणि त्याचा परिणाम शहरांवर होणार आहे. त्यामुळे शहराची संस्कृती टिकवायची असेल तर पब्लिक पार्क उभे करणे गरजेचे आहे. त्यासाठी निधीही उपलब्ध करून दिला जाईल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात इमारती व सार्वजनिक सुविधा शहराच्या विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. शेतकऱ्यांसाठी सक्षम मार्केट उभे केले तर नागरिकांना ताजा भाजीपाला मिळेल. शहराची अर्थव्यवस्था शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. आमदार संग्राम जगताप व डॉ. सुजय विखे पाटील शहर विकासासाठी पुढाकार घेत आहेत. शहराला चांगली टीम मिळाली असून सौंदर्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. आयुक्त यशवंत डांगे यांचे कामही समाधानकारक आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती पैलवान सुभाष लोंढे, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, निखिल वारे, संजय चोपडा, सुरेश बनसोडे, मनोज कोतकर, महेश तवले, प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, बाळासाहेब पवार, गणेश कवडे, करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, अरविंद शिंदे, महेश लोंढे, नगरसेविका मयुरी जाधव, शितल ढोणे, आशाताई डागवाले, सुजाता पडोळे, विजय परदेशी, विनायक देशमुख, अजय ढोणे, दत्ता गाडळकर, रेवनाथ पवार, सागर बोरुडे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहरामध्ये राजमाता जिजाऊ शहाजीराजे भोसले हॉस्पिटलचे काम पूर्णत्वास आले असून खाजगी हॉस्पिटलला लाजवेल अशी इमारत उभी राहिली आहे. ही नगरकरांच्या मालकीची आहे. आता दुसरी मोठी इमारत नेहरू मार्केटच्या ठिकाणी उभी राहत आहे. येथे भाजी मार्केट व व्यापारी संकुल तयार होणार आहे. पूर्वीचा इतिहास जपण्यासाठी इमारतीवर घड्याळ बसवण्यात येणार असून ते नगरचे प्रतीक ठरेल. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मोठा निधी मिळाला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शनही लाभत आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, चितळे रोड येथील नेहरू मार्केट चार मजली इमारतीच्या स्वरूपात उभारले जाणार आहे. ग्राउंड फ्लोअरवर ५३ भाजी ओटे आणि ५७ गाळे असतील. या प्रकल्पासाठी अंदाजे ९ कोटी ३४ लाख रुपयांचा खर्च येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयुक्त यशवंत डांगे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी मानले.

या प्रकल्पामुळे नेहरू मार्केट परिसराला आधुनिक रूप मिळणार असून शहराच्या विकासासोबतच पारंपरिक बाजारपेठेचा इतिहास जपण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## समर्पित व एकनिष्ठ कार्यकर्ते हीच भाजपची मोठी ताकद : राधाकृष्ण विखे पाटील

**भाजपच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी महावीर कांकरिया यांची निवड**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते महावीर कांकरिया यांची निवड करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते कांकरिया यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, बाबासाहेब सानप, युवा मोर्चाचे अध्यक्ष रूद्रेश अंबाडे, देवेंद्र दुधाले, ॲड. देवेंद्र बंब आदी उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील कांकरिया यांना शुभेच्छा देताना म्हणाले की, भारतीय जनता पक्ष आज देशातील सर्वात मोठा लोकप्रिय आणि राष्ट्र उभारणीत योगदान देणारा पक्ष आहे. समर्पित व निष्ठावंत कार्यकर्ते ही पक्षाची ताकद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आज भारत विश्व गुरू म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल नेतृत्वाखाली पक्ष अतिशय मजबूत बनला आहे. महावीर कांकरिया हे मागील ३० वर्षांपासून नगर शहरात अतिशय निष्ठेने पक्ष संघटनेत काम करत आहेत. त्यांच्या सारख्या तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पक्षाकडून उचित सन्मान निश्चितच केला जातो.

महावीर कांकरिया म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा राष्ट्र निर्माणात योगदान देणारा पक्ष आहे. पक्षाचे ध्येय धोरणे आणि विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी नेहमीच प्रयत्न असतो. तीस वर्षांपासून संघटनेत काम करताना पदाची अपेक्षा केली नाही. आता पक्षाने महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या माध्यमातून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न असेल. या निवडीबद्दल कांकरिया यांचे माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्यासह सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ८९.०४ टक्के



निधी इप्पलपेल्ली | ममता चौधरी | वैष्णवी चोथे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत बोर्ड परीक्षा (इयत्ता १० वी) फेब्रुवारी/मार्च २०२६ चा निकाल ८९.०४ टक्के लागला असून विद्यालयाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमांना आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला यश मिळाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत विद्यालयातून कु. निधी अविनाश इप्पलपेल्ली हिने ८३.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. ममता नवराम चौधरी हिने ८०.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. वैष्णवी पांडुरंग चोथे हिने ७४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या निकालात भर घातली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ. विजया चंद्रकांत रेखे, सचिव किरण वैकर, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, खजिनदार उमेश चंद्रकांत रेखे, माजी अध्यक्ष दि. ना. जोशी, कार्यकारी सदस्य महेश चंद्रकांत रेखे, उदयकुमार भणगे, उमेश नगरकर तसेच विद्यालयाचे प्राचार्य सुनिल पंडित यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हे प्रमुख घटक असल्याचे प्राचार्य सुनिल पंडित यांनी सांगितले. पुढील काळातही अधिक गुणवंत विद्यार्थी घडवण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.

## श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा दहावीचा निकाल शंभर टक्के

**२३२ पैकी २३२ विद्यार्थी उत्तीर्ण; श्रावणी दळवी प्रथम**



श्रावणी दळवी | मंजुषा बोरकर | ईश्वरी पवार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, माध्यमिक विभाग यांनी सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या सर्व २३२ विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाच्या निकालामध्ये विद्यालयातील १२२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य (डिस्टिंक्शन) मिळवले असून ६५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच ३६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ९ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश संपादन केले आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे हा अभिमानास्पद निकाल लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रावणी गणेश दळवी हिने ९७.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. मंजुषा महेश बोरकर हिने ९६.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. ईश्वरी सुनील पवार हिने ९६.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. या तिन्ही विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून त्यांच्या यशामुळे विद्यालयाच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर शिस्त, सातत्य आणि अभ्यासू वृत्ती यामध्येही विशेष ठसा उमटविला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या अथक परिश्रमांना शिक्षकांनी दिलेले योग्य मार्गदर्शन आणि पालकांनी दिलेले प्रोत्साहन यांची जोड मिळाल्याने हा उल्लेखनीय निकाल शक्य झाल्याचे बोलले जात आहे. निकाल जाहीर होताच विद्यालय परिसरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

विद्यालयाच्या प्राचार्या सौ. वसुधा सुनील जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत वर्षभर विविध उपक्रम, सराव परीक्षा, शैक्षणिक नियोजन आणि वैयक्तिक मार्गदर्शन यावर विशेष भर दिला. प्रत्येक विद्यार्थ्याकडे व्यक्तिगत लक्ष देत त्यांच्या गुणवत्तेनुसार अभ्यासाचे नियोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी वेळोवेळी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. ''यश हे केवळ गुणांपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातही असते,'' अशी भूमिका त्यांनी सातत्याने विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यांच्या सकारात्मक नेतृत्वामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होऊन विद्यालयाने शंभर टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी नोंदवली.

विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षभर अभ्यासाचे काटेकोर नियोजन केले. विषयानुसार विशेष मार्गदर्शन वर्ग, नियमित चाचण्या, उत्तरपत्रिका विश्लेषण, गुणवृद्धी उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या शंकानिरसनासाठी स्वतंत्र सत्रांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करण्यात आले. शिक्षकांमध्ये समन्वय राखून विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात त्यांच्या नियोजनाचा मोठा वाटा राहिला. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळे विद्यालयाचा निकाल अधिक उज्ज्वल ठरल्याची भावना शिक्षक व पालकांनी व्यक्त केली.

या उल्लेखनीय यशाबद्दल श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर येथील सर्व माननीय पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. कार्यकारीणी सदस्य तथा शालेय समिती चेअरमन ॲड. मा. श्री किशोरजी देशपांडे, श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्र. स. ओहोळ, सुरेशजी क्षीरसागर, मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी , मंडळाचे सदस्य श्री स्वप्निल कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांतून हे यश संपादन झाल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यालयाच्या या अभूतपूर्व यशामुळे सावेडी परिसरासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## घोगरगावात संत चोखामेळा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**घोगरगाव –** संत चोखामेळा यांच्या पुण्यतिथीनिमित्त घोगरगाव येथील हनुमान मंदिरात त्यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले. भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.

या पुण्यतिथी कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी वाबळे यांच्या प्रेरणेतून करण्यात आली असून त्यांनी दीर्घकाळापासून केलेल्या सामाजिक व धार्मिक कार्याला आता गती मिळाल्याचे यावेळी दिसून आले. ग्रामस्थ व सहकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

या प्रसंगी गावातील विद्यमान सरपंच सुजाता ताई भोसले, बाळासाहेब उगले, जालिंदर उल्हारे, प्रकाश बोरुडे (सर), महेश बोरुडे, उत्तम धामणे, मिलिंद भोसले, दिगंबर लगड, संभाजी शिंदे, बाबुराव उल्हारे, भगवान उल्हारे, बाबासाहेब शेटे, आप्पासाहेब बोरुडे, तुकाराम भोसले, ज्ञानदेव भोसले, अधिक उगले, अर्जुन उगले, नसीर सय्यद, देवेंद्र शेटे, सिताराम दाते, माधव तरटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान संत चोखामेळा यांच्या जीवनकार्याचे स्मरण करून त्यांच्या समतेच्या व मानवतेच्या विचारांचा जागर केला गेला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजात ऐक्य व बंधुभाव वाढवण्याचा संकल्प व्यक्त केला.

### प्रभाग क्रमांक ११ मधील आमदार संग्राम जगताप यांच्या विकासनिधीतून

# ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते लक्ष्मीकारंजा ते चितळेरोड येथील रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक ११ मधील लक्ष्मीकारंजा ते चितळे रोड येथील रस्त्याचे आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून सुरु असलेल्या कामाचा शुभारंभ पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते करण्यात आला नगरसेविका सुनिता संतोष गेनप्पा यांच्या पुढाकारातून आणि संतोष गेनप्पा यांच्या विशेष प्रयत्नातून हे काम मार्गी लागले आहे.

प्रभाग क्रमांक ११ मधील लक्ष्मीकारंजा ते चितळे रोड येथे येथील रस्त्याच्या कामाचा शुभारंभ पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते करण्यात आले यावेळी आमदार संग्राम जगताप ,महापौर जोती गाडे उपमहापौर धनंजय जाधव ,मनपा आयुक्त यशवंत डांगे ,स्थायी सभापती सुभाष लोंढे ,नगरसेवक गणेश कवडे, नगरसेविका सुनिता संतोष गेनप्पा, संतोष गेनप्पा ,किशोर डागवाले ,निखिल वारे ,अनिल बोरुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना संतोष गेनप्पा म्हणाले की, प्रभाग क्रमांक ११ मधील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन पायाभूत सुविधांचा विकास करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. बंद पाईपलाईन गटार काम पूर्ण झाल्यानंतर पावसाळ्यात साचणारे पाणी, दुर्गंधी तसेच आरोग्यविषयक समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील. निधी उपलब्ध होताच कामे हाती घेऊन ती वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण केली जात आहेत.

ते पुढे म्हणाले, या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी रस्ते, गटार, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक सोयीसुविधा यांवर विशेष भर दिला जात आहे. लोकप्रतिनिधी, आणि नागरिक यांचा समन्वय ठेवून कामे पार पाडली जात आहेत. कोणतेही काम अर्धवट न ठेवता दीर्घकाळ टिकणारे आणि नागरिकांच्या उपयोगाचेच केले जाईल, हा आमचा ठाम निर्धार आहे.

या प्रसंगी नगरसेविका सुनीता संतोष गेनप्पा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हेच माझे प्राधान्य राहिले आहे. विकास निधीचा योग्य व पारदर्शक वापर करून जास्तीत जास्त कामे मार्गी लावली जात आहेत. गटार, रस्ते व पाणीपुरवठा यांसारखी कामे पूर्ण झाल्यास प्रभागाचा चेहरामोहरा बदलणार असून, नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

# ॲलेक्स कपमध्ये गुलमोहर व फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीची विजयी आगेकूच

### उपांत्य फेरीत धडक | गुलमोहरचा ५–० दणदणीत विजय; पेनल्टी टायब्रेकरमध्ये फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीची बाजी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** शहरातील भुईकोट किल्ला मैदानावर सुरू असलेल्या ॲलेक्स कपच्या ८ व्या पर्वातील फुटबॉल स्पर्धेत गुरुवारी (दि. ७ मे) रंगलेल्या दोन चुरशीच्या सामन्यांमध्ये गुलमोहर स्पोर्टस क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांनी शानदार विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली. उत्कृष्ट खेळ, वेगवान पासिंग आणि गोलसमोर अचूक फिनिशिंग यामुळे गुरुवारचे सामने प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरले.

दिवसातील पहिला सामना गुलमोहर फुटबॉल क्लब आणि अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशन यांच्यात झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच गुलमोहरच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व निर्माण केले. जलद हालचाली, अचूक पासिंग आणि समन्वयपूर्ण खेळाच्या जोरावर गुलमोहरने तब्बल ५–० गोलने शानदार विजय संपादन केला.

सामन्याच्या १६ व्या मिनिटाला प्रणव पंडित याने पहिला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर आदित्य गुगळे याने २२ व्या आणि ३८ व्या मिनिटाला सलग दोन गोल करत संघाला मजबूत आघाडी मिळवून दिली. ३३ व्या मिनिटाला पार्थ मस्कर याने आणखी एक गोल करत प्रतिस्पर्ध्यांवरील दबाव वाढवला. सामन्याच्या ४७ व्या मिनिटाला अहमदनगर डिस्ट्रिक्ट संघाकडून झालेल्या 'ऑन गोल'मुळे गुलमोहरच्या खात्यात पाचवा गोल जमा झाला. संपूर्ण सामन्यात अहमदनगर डिस्ट्रिक्ट संघाला एकही गोल करता आला नाही.

दिवसातील दुसरा सामना सुमन फुटबॉल क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांच्यात रंगला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून सावध आणि बचावात्मक खेळ करत एकमेकांना जोरदार टक्कर दिली. आक्रमण आणि प्रतिआक्रमणांच्या मालिकेनंतरही नियोजित वेळेत कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. त्यामुळे सामना ०–० गोलने अनिर्णित राहिला.

यानंतर सामन्याचा निकाल पेनल्टी टायब्रेकरवर लागला. अत्यंत तणावपूर्ण वातावरणात फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीने ४–३ गोलने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. सुमन फुटबॉल क्लबकडून अविनाश शिंदे, अक्षय गायकवाड आणि तनिष्क गायकवाड यांनी प्रत्येकी एक गोल केला. तर फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीकडून ट्रूस्क डमपुई, जोसी ललसाईमसंग, जोसेफ पुया आणि क्लिमेंट चँगसन यांनी अचूक गोल करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

या संघात रंगणार उपांत्य फेरीचे सामने

भुईकोट किल्ला मैदानावर शुक्रवारी संध्याकाळी उपांत्य फेरीचे सामने रंगणार असून फुटबॉलप्रेमींसाठी मोठा थरार पाहायला मिळणार आहे.

फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लब विरुध्द गुलमोहर स्पोर्टस क्लब

फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी विरुध्द फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड

उपांत्य फेरीत कोणते संघ अंतिम फेरीत प्रवेश करतात याकडे आता क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

### लिटील वंडर्स स्कूलचे उत्तुंग यश

# सलग १२ वर्ष १००% निकालाची परंपरा कायम







**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शांतिनिकेतन फौंडेशनचे लिटील वंडर्स स्कूल व विजडम हायस्कूल जेऊर (बा.) ता. नगर, जि. अहिल्यानगर, या शाळेच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सलग बाराव्या वर्षीही माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये शंभर टक्के निकालाची उत्तुंग परंपरा कायम ठेवीत घवघवीत यश संपादन केले.

या वर्षी शाळेची विद्यार्थिनी कु. सायली संजय वाघ हिने ८७.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर कु. जिज्ञासा अमोल वाघ हिने ८१.२०% गुण मिळवून द्वितीय तर कु. पायल कानिफनाथ शिकारे हिने ८०.००% गुण मिळवून तृतीय ४६३५ क्रमांक मिळविला व इतर सर्व विद्यार्थ्यांनीही ६०% पेक्षा जास्त गुण मिळवून शाळेचा नावलौकिक कायम राखला.

आमच्या विद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देवून अभ्यास करवून घेतला जातो त्यामुळेच शाळेव्यतिरिक्त बाहेरचे कोणतेही महागडे कोचिंग क्लासेस लावायची गरज पडत नाही. म्हणूनच सलग बारा वर्ष १००% निकाल देणारे आमच्या पंचक्रोशीतील हे एकमेव विद्यालय आहे, अशी माहिती शाळेच्या संचालिका सौ. स्वाती चेमटे यांनी दिली. यासाठी शाळेच्या शिक्षिका सौ. कल्पना वड्डेपल्ली, सौ. आयेशा सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चंद्रमौळी श्री धात्री यांनी दिली.

या सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे, जि. प. माजी सभापती श्री. बाजीराव पाटील गवारे, सरपंच सौ. ज्योती तोडमल, उपसरपंच सौ. अनिता बनकर, माजी सरपंच श्री. विकास कोथिंबीरे व श्री. मधुकरराव मगर तसेच पंचक्रोशीतील सर्व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# अंजली खवलेची राष्ट्रीय भरारी!

### सबजुनिअर नॅशनल बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**शेवगाव–** मैदानी खेळांमधील आपली गुणवत्ता सिद्ध करत शेवगाव येथील कर्मयोगी आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची खेळाडू अंजली दीपक खवले हिने राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. ओरिसा येथे दि. २४ ते २९ मे २०२६ या कालावधीत आयोजित सबजुनिअर नॅशनल बेसबॉल चॅम्पियनशिपसाठी तिची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे. या महत्त्वाच्या स्पर्धेसाठी सज्ज होण्याकरिता अंजली दि. १४ ते २० मे २०२६ या काळात डॉ. कदम गुरुकुल स्कूल, इंदापूर (पुणे) येथे आयोजित महाराष्ट्र राज्याच्या विशेष सराव शिबिरात सहभागी होणार असून, तेथे ती राष्ट्रीय स्पर्धेचे धडे गिरवणार आहे.

अंजलीच्या या कौतुकास्पद यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा बेसबॉल संघटनेचे अध्यक्ष अरुण चंद्रे, उपाध्यक्ष सुधीर चापळगावकर आणि सचिव मकरंद कोऱ्हाळकर यांनी तिचे विशेष अभिनंदन करून गौरव केला आहे. तिला या वाटचालीत क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत, संतोष ढोले, सचिन वाल्हेकर, विक्रम घुटे आणि वैष्णवी फलके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. अंजलीच्या या निवडीमुळे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे प्रमुख डॉ. ॲड. विद्याधरजी काकडे, सहप्रमुख सौ. हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, विश्वस्त पृथ्वीसिंगभैय्या काकडे, शालेय शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती वंदना पुजारी, श्री. अशोक आहेर आणि प्राचार्य संपत दसपुते यांनी आनंद व्यक्त केला आहे. यासोबतच उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, अशोक तमनर, रवींद्र आगळे, अविनाश भागवत, सर्व शिक्षक आणि पालकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील एका खेळाडूने आपल्या जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरापर्यंत गाठलेला हा टप्पा संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद ठरत असून, सध्या तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गुगळे हायस्कूल व वारे कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एस.एस.सी. बोर्ड मार्च २०२६ परीक्षेत शिशु संगोपन संस्था संचालित नगर शहरातील श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल विद्यालयाचा इ. १० वी परीक्षेचा निकाल ९४.७३ लागला आहे. यामध्ये एकूण १३३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १२६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विशेष प्राविण्यासह २५ विद्यार्थी व प्रथम श्रेणीमध्ये ४३ विद्यार्थी तसेच व्दितीय श्रेणीमध्ये ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हायस्कूलमध्ये कु. दरेकर अनुष्का सुभाष ही ९४.४० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. कु.नन्नवरे कांचन निलेश ही ९१.६० टक्के गुण मिळवून व्दितीय तर कु. खताळ साक्षी सुधीर ही ९१.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात तृतीय आलेली आहे.

तसेच वारे कनिष्ठ महाविद्यालयाचा इ.१२वी परीक्षेचा एकूण निकाल ६८.६५ लागला असून विज्ञान शाखेचा निकाल ९०.०० टक्के, कला शाखेचा ५६.६६ टक्के तर वाणिज्य शाखेचा ५२.४५ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेमधील तांबे पद्मश्री रावसाहेब या विद्यार्थ्यांने ६१.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे. कोहोक कृष्णा उमेश हा ६०.३३ टक्के मिळवून व्दितीय तर कु.भापकर अश्विनी गोरख ही ५५.५० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. कला शाखेमधील कु. कुसळकर स्वाती नागेश्वर या विद्यार्थीनीस ७९.६७ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे व काळे सार्थक संपत हा ६३.०० टक्के मिळवून व्दितीय आणि कु. खेंगट वृषाली नामदेव ही ५६.८३ टक्के गुण मिळवून तृतीय आलेली आहे. तसेच वाणिज्य शाखेमध्ये कु.सोनवणे प्रांजल चंद्रकांत हीस ६०.०० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे व कु. तवले कोमल विजय ५६.८३ टक्के मिळवून व्दितीय तर कु. तांबे वैष्णवी संदिप ५४.१७ टक्के गुण मिळवून तृतीय आलेली आहेत.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र.धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत तसेच संस्थेचे विश्वस्त सीए रमेश फिरोदिया, सीए राजेंद्र गुंदेचा, दिपक गांधी, बन्सी नन्नवरे, अभय गांधी, सौ. रश्मी येवलेकर, संजय चोपडा, श्रीम्, सुमन वारे, अभय गांधी, रमेश मुनोत, शिवनारायण वर्मा, विनोदकुमार कटारिया, कांचन गावडे तसेच प्राचार्य दत्तात्रय कसबे फिरोदिया प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी व सर्व शिक्षकवृंद, पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# सारडा महाविद्यालयाचा कृष्णा शिंदे यांची युरोपमधील लूट युनिव्हर्सिटी मध्ये पीएच.डी. साठी निवड

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील हिंदसेवा मंडळ संचलित पेमराज सारडा महाविद्यालय चे माजी विद्यार्थी कृष्णा संतराम शिंदे यांची युरोपमधील प्रतिष्ठित लूट युनिव्हर्सिटी येथे पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी तसेच ज्युनियर रिसर्चर पदासाठी निवड झाली असून, ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

कृष्णा शिंदे यांनी सन २०२३ मध्ये पेमराज सारडा महाविद्यालयातून रसायनशास्त्र विषयात बी.एससी. पदवी उत्कृष्ट गुणवत्तेसह पूर्ण केली. त्यांच्या बी.एससी. शिक्षणकाळात रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रत्ना वाघमारे यांनी त्यांना सातत्याने मार्गदर्शन केले. शैक्षणिक प्रगती, संशोधनाची आवड आणि करिअरविषयक दिशा यांसह विविध बाबींमध्ये त्यांनी कृष्णा यांना मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनामुळेच कृष्णा यांची संशोधन क्षेत्रातील आवड अधिक दृढ झाली.

त्यानंतर त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मधून भौतिक रसायनशास्त्र या विषयात एम.एससी. पूर्ण केले. त्यांच्या पदव्युत्तर शिक्षणाचा केंद्रबिंदू फंक्शनल पॉलिमर्स आणि ॲडव्हान्स्ड मटेरियल्स हा होता.

शिक्षणादरम्यान त्यांनी स्पेक्ट्रोस्कोपी, इलेक्ट्रोकेमिस्ट्री आणि सॉलिड स्टेट केमिस्ट्री या विषयांमध्ये भक्कम पायाभूत ज्ञान संपादन केले. त्यांचा संशोधन प्रबंध फंक्शनल पॉलिमर्सवर आधारित असून, त्यांनी मॉलिक्युलरली इम्प्रिंटेड पॉलिमर्स या विषयावर विशेषतः सिलेक्टिव्ह रिकग्निशन ॲप्लिकेशन्ससाठी संशोधन कार्य केले आहे.

तसेच त्यांनी युनिव्हर्सिटी येथे प्रोजेक्ट असिस्टंट म्हणून कार्य करताना मटेरियल सिंथेसिस आणि विविध कॅरेक्टरायझेशन तंत्रज्ञानामध्ये प्रत्यक्ष संशोधनाचा अनुभव मिळवला. या कालावधीत त्यांनी आपले मार्गदर्शक डॉ. सुधीर कुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एक भारतीय पेटंट प्रकाशित केले तसेच प्रतिष्ठित या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकामध्ये संशोधन लेख प्रकाशित केला. ही उपलब्धी त्यांच्या संशोधनक्षमता आणि वैज्ञानिक योगदानाचे द्योतक मानली जात आहे.

पीएच. डी.प्रवेश प्रक्रियेसाठी एकूण २८५ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी काही निवडक उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. अत्यंत स्पर्धात्मक प्रक्रियेतून कृष्णा शिंदे यांनी यश मिळवत अंतिम निवड प्राप्त केली. मुलाखतीदरम्यान त्यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीबरोबरच संशोधन अनुभव, फंक्शनल पॉलिमर्स, मॉलिक्युलरली इम्प्रिंटेड पॉलिमर्स आणि प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रभावीपणे सादर केला. तसेच लूट युनिव्हर्सिटी मधील संशोधन वातावरणात योगदान देण्याची आपली तयारी आणि संशोधनाविषयीची दृष्टी त्यांनी स्पष्ट केली.

विशेष म्हणजे, त्यांची लूट युनिव्हर्सिटी मध्ये जूनियर रिसर्चर म्हणूनही नियुक्ती झाली असून, त्यांना दरमहा सुमारे २.८ ते ३ लाख इतके मानधन मिळणार आहे. ही उपलब्धी त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कौशल्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्षमतेची साक्ष देणारी आहे.

२८५ विद्यार्थ्यांच्या अर्जदारांमधून अंतिम निवड होणे हा त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, ही उपलब्धी महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

कृष्णा शिंदे हे दिनांक ११ मे २०२६ रोजी पुढील शिक्षणासाठी फिनलंडला रवाना होणार असून, तेथे लूट युनिव्हर्सिटी मध्ये पीएच. डी.अभ्यासासोबत फंक्शनल मटेरियल्स आणि प्रगत संशोधन क्षेत्रात कार्य करणार आहेत. रसायनशास्त्राचा उपयोग करून पर्यावरणीय निरीक्षण, सेन्सर तंत्रज्ञान आणि प्रगत मटेरियल डिझाइन यांसारख्या क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन करण्याची त्यांची विशेष इच्छा आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि सर्व कर्मचारी यांनी कृष्णा शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

(पान १ वरून)

### विकासकामांतून अहिल्यानगरची प्रकाशाकडे वाटचाल - पालकमंत्री विखे

प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एलईडी व तिरंगा लाईटमुळे हा परिसर उजळून निघाला असून सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे. विकासकामांच्या माध्यमातून अहिल्यानगर शहर प्रकाशाकडे वाटचाल करत आहे.

### तक्रार निवारण दिनात एक हजार अर्जांचा निपटारा

करण्यात आली. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

जिल्हा पोलीस प्रशासनाकडुन आयोजित करण्यात आलेल्या तक्रार निवारण दिनाच्या माध्यमातून नागरीक व पोलीस यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होत असल्याचे दिसून आले.

### प्रवाशांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार - पालकमंत्री विखे पाटील

अनिल बोरुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, मनोज कोतकर, सुरेश बनसोडे, मनोज दुल्लम, महेश लोंढे, विनायक देशमुख, रवींद्र बारस्कर, करण कराळे, दत्ता गाडळकर, नगरसेविका शारदाताई ढवण, सुजाता पडोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### नेवासा पोलीस निरीक्षकांचे मध्यरात्री 'मिशन ऑलआऊट'

पोलीस दलाच्या या सतर्कतेमुळेच सामान्य नागरिक निर्धास्तपणे झोपू शकतात. थंडी-वारा किंवा कोणताही सण असो, 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याप्रमाणे पोलीस आपली कर्तव्य बजावत आहेत. ''नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे. आपल्या सुरक्षेसाठी नेवासा पोलीस दल सदैव सज्ज आहे. गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी आणि शांतता टिकवण्यासाठी आमचे गस्त पथक व नाकाबंदी मोहीम अशीच सुरू राहील,'' असे आश्वासन पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले.

**नागरिकांकडून कौतुक**

नेवासा पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांचा हा 'ग्राउंड रिपोर्ट' आणि मध्यरात्रीची कर्तव्यदक्षता पाहून नेवासा तालुक्यातील जनतेने पोलिसांचे आभार मानले आहेत. ''आम्ही आमच्या घरी सुरक्षित आहोत, कारण आमचे पोलीस बांधव बाहेर रस्त्यावर जागले आहेत,'' अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### साखरपुडा कार्यक्रमातून दागिने लांबविणाऱ्या बालकाला मध्य पदेशातून घेतले ताब्यात

असता त्यांच्या पायाजवळ ठेवली सोन्याची दागिने असलेली पिशवी अज्ञात चोरट्याने लांबविली. यावरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाआधारे तसेच यापूर्वी अशा स्वरुपाच्या गुन्हे करणाऱ्या पद्धतीचा अभ्यास करुन सदर गुन्हा हा आठ वर्षांच्या विधीसंघर्षित बालकाने (रा. कडीया सांसी, पोस्ट बोडा, तहसील पचोर, जिल्हा राजगड, मध्यप्रदेश) याने त्याच्या साथीदारासंह केला असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. वरिष्ठांचे आदेशाने कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी पोलीस पथकाला मध्यप्रदेश येथे तपासकामी तात्काळ रवाना केले व स्थानिक पोलिसांच्या मदतीने दुर्गम व अति संवेदनशील भागात असलेल्या कडीया सांसी येथे जाऊन चार दिवस प्रयत्न करून बालकाचा शोध घेतला. त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीला गेलेले सर्व दागिने हस्तगत करण्यात आले. पुढील तपास सपोनि कुणाल सपकाळे करत आहेत.